# Question Paper
## Set- II
### Std. – 10th EM
### Subject – Marathi L.L.

**Time : 3 Hrs.** **Marks : 80**

## विभाग १ : गदय

### पठित गदय

**प्र.१ अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** [८]

१) काव्यांचे कोणकोणते प्रकार प्रस्तुत उताऱ्यात सांगितले आहेत? २

अ) ☐ आ) ☐ इ) ☐ ई) ☐

| | | |
|---|---|---|
| **कविता** | : | सुश्रुत, ओळखलंस मला? अरे, मी आहे कविता. आपली तर फार पूर्वीपासून चांगलीच ओळख आहे, नाही का? तुमच्या पाठ्यपुस्तकांतल्या सगळ्या कविता तुम्ही तालासुरांत म्हणता. |
| **सुश्रुत** | : | हो ताई! मला आठवतंय. 'ही आवडते मज मनापासुनी शाळा' आणि 'श्रावणमासी हर्ष मानसी' या माझ्या आवडत्या कविता. |
| **कविता** | : | छान हो. सुश्रुत, माझं रूप छोटंसं, आटोपशीर. मोजक्या शब्दांत मोठ्ठा आशय व्यक्त करणं हे माझं वैशिष्ट्य. यमक, अनुप्रास अशा शब्दालंकारांनी माझं बाह्यरूप आणि उपमा, उत्प्रेक्षा, रूपकासारख्या अर्थालंकारांनी माझे अंतरंग सजवून कवी मला अधिक आशयगर्भ करतात. |
| **सुश्रुत** | : | मॅडम नेहमी सांगतात कवितेची शब्दरचना अर्थपूर्ण व चपखल असते. कल्पनांचा सुंदर आविष्कार कवितेत असतो, हे बरोबर ना? |
| **कविता** | : | अगदी बरोबर! आणखी काय माहीत आहे सुश्रुत तुला? |
| **सुश्रुत** | : | ताई, मला असं वाटतं संगीतकारांनी स्वरराज चढवला, की तुझं गाण्यात रूपांतर होतं, कारण तुला मी पाठ्यपुस्तकात वाचतो आणि सीडीमध्ये, चित्रपटात ऐकतोसुद्धा. |
| **कविता** | : | छान निरीक्षण आहे हं तुझं. बरं, मला एक सांग तुझ्या शाळेत मराठी दिन साजरा करतात का ? |
| **सुश्रुत** | : | हो, करतात ना. |
| **कविता** | : | कोणत्या तारखेला करतात ? |
| **सुश्रुत** | : | अंऽऽऽ, २७ फेब्रुवारीला. |
| **कविता** | : | अगदी बरोबर. तो कोणाचा जन्मदिवस आहे, माहीत आहे तुला? |
| **सुश्रुत** | : | नाही गं. |
| **कविता** | : | 'नटसम्राट' नाटकाचे लेखक वि. वा. शिरवाडकर म्हणजेच कवीवर्य कुसुमाग्रज यांचा. त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहाला मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला आहे. |
| **सुश्रुत** | : | खरंच? |
| **कविता** | : | कुसुमाग्रजांबरोबरच केशवसुत, बालकवी, बा. भ. बोरकर, बा. सी. मढेकर, शांता शेळके, इंदिरा संत, सुरेश भट, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे अशा अनेक कवींनी मला |

आपल्या प्रतिभेने सजवले. संतकाव्यापासून पंतकाव्य, मध्ययुगीन काव्य, शाहिरी काव्य अशी वळणे घेत आधुनिक काळात मी मुक्त छंदाचे रूप धारण केले आहे.

२) **i) २७ फेब्रुवारी हा कोणाचा जन्मदिवस आहे?** १

**ii) प्रस्तुत उताऱ्यात उल्लेखलेल्या दोन कविता** – १

३) **स्वमत -** 'रंग साहित्याचे' या पाठाबद्दल तुमचे मत लिहा. ३

**प्र.१ आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **[८]**

१) **चौकटी पूर्ण करा.** २

i) अब्दुलच्या हातात असलेल्या दोन वस्तू – [ ] [ ]

ii) अब्दुलच्या पेटीत असलेल्या बांगड्यांचे रंग – [ ] [ ]

अब्दुल बसस्टॉपवर आला. अनेक ठिकाणी उसवलेल्या स्वेटरमधून थंडी चांगलीच जाणवत होती. बस आली. बांगड्यांची पेटी आणि पिशवी सांभाळत अब्दुल बसमध्ये चढला. अगदी खिडकीजवळ बसला. पेटी अलगद उचलून त्याने आपल्या मांडीवर ठेवली. गर्दीत कुणाचा धक्का लागला तर...? लाल, हिरव्या, निळ्या रंगीबेरंगी बांगड्यांकडे मोठ्या कौतुकाने त्याने बघितले. बस सुरू होताच थंडगार वाऱ्याचा झोत अधिकच त्रासदायक वाटू लागला. अब्दुलने मफलर कानाला घट्ट लपेटून घेतला. जिल्हाधिकारी कचेरीजवळ पाऊण बस रिकामी झाली. तपोवनाकडे कोण जातोय कशाला? जेमतेम पाच-सहाच उतारू राहिले बसमध्ये. तपोवनाच्या त्या गोलाकार कमानीकडे अब्दुलचे लक्ष गेले. गेल्या सहा महिन्यांत केवढी फुलली आहे तिच्यावरती वेल. मागे आलो तेव्हा जेमतेम हातभर होती. अब्दुल गेटजवळ आला आणि लहान लहान मुलींनी एकदम गलका करायला सुरुवात केली.

"चुडीवाऽला आऽऽला, चुडीऽऽवाला आला."

आंब्याच्या झाडाखाली असलेल्या चौथऱ्यावर अब्दुल बसला आणि क्षणातच सारा कामधंदा सोडून स्त्रियांची गर्दी अब्दुलच्या आजूबाजूला जमली. "त्या लाल रंगाच्या मला...त्या हिरव्या मला...चुडीवाला, माझ्यासाठी आरसा आणला? मागच्या वेळी मी सांगितलं होतं नं?"

२) **पुढील घटना योग्य त्या क्रमाने लिहा:** २

i) अब्दुल बसमध्ये चढला.

ii) अब्दुल बसस्टॉपवर आला.

iii) अब्दुल अगदी खिडकीजवळ बसला.

iv) बस आली.

३) **स्वमत -** उतारऱ्यातून स्पष्ट होणारी अब्दुलची स्वभाव वैशिष्ट्ये लिहा. ३

**प्र.१ इ) पुढील अपठित उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **[८]**

१) **आकृत्या पूर्ण करा. i)** १

आंब्याच्या झाडाला लागणारे हवामान - → i) ________ → ii) ________

**ii)** [ ] ← **फळांचा रंग** → [ ] १

‘उन्हाळा' हा शब्द आपल्या मनात काय घेऊन येतो? काहीतरी रसाळ, गोड आणि स्वादिष्ट, काहीतरी असे की जे खायला आपणा सर्वांना फार प्रिय असते. आंबा! आंब्याला ‘फळांचा राजा' म्हणतात. आंब्याचे झाड ६० फुटांपर्यंत उंच वाढते. आंब्याच्या झाडांना चांगली फळे येण्यासाठी गरम आणि कोरडे हवामान लागते. लागवड केल्यानंतर चार ते सहा वर्षांनी आंब्याच्या झाडाला फळं येतात. फळ सोनेरी पिवळे, हिरवे अथवा लालजर्द असते. फळाचा गर सामान्यपणे गडद नारंगी छटा असलेल्या पिवळ्या रंगाचा असतो. तो गोड आणि रसाळ असून, त्याला सर्वाधिक स्वादिष्ट गंध असतो. फळाला एकच मोठी बी आतमध्ये असते. आंब्यांपासून लोणची, मुरंबे, रस आणि मिठाई बनते. आंबे जीवनसत्त्वांनी व खनिजांनी समृद्ध असतात.

२) i) **एका वाक्यात उत्तर लिहा.** १

उन्हाळा आपल्या मनात कोणती भावना रुजवतो?

ii) **साखळी पूर्ण करा.** १

आंब्यापासून बनणारे पदार्थ → [ ] [ ]

## विभाग २ : पदय

**प्र.२ अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** [८]

१) **चौकट पूर्ण करा.** २

**आपण अशाप्रकारे झाडासारखं व्हावं** → i) ii) iii) iv)

झाड वसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत.......
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात द्वांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिराना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं

| |
|---|
| मुळावं मुरावं कसं तर? झाडासारखं घट्ट पाय रोवीत<br>जगावं कसं तर? हिरवंगार झाडासारखं<br>रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं! |

२) **i) योग्य पर्याय निवडा व वाक्य पुन्हा लिहा.** २

___________ झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं. (पावसाळ्यात / पानझडीनंतर / मोठे झाल्यावर )

ii) 'पालवी फुटल्यावर' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

३) **i) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा.** २

अ) वस्त्र ब) मुसाफिर क) संथ ड) चितंन

**ii) खालील ओळीतील काव्यसौंदर्य स्पष्ट करा.** २

हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळांव मुरावं कसं तर? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर? हिरंवगार झाडासारखं

**प्र.२ आ) 'अंकिला मी दास तुझा' व 'स्वप्न करू साकार' या दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील मुद्दयांना अनुसरून कृती सोडवा.** [८]

१) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री. १

२) कवितेचा रचनाप्रकार. १

३) कवितेचा विषय. १

४) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. १

अंकिला दास गणू :- अ) कनवाळू ब) धरणी क) हुबंरत ड) पाऊस

**किंवा**

स्वप्न करू साकार :- अ) नौबत ब) लाखदा क) हस्त ड) संपदा

५) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे २

६) कवितेतून मिळणारा संदेश. २

**विभाग ३ : स्थूलवाचन**

**प्र.३ खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** [६]

१) तुम्हांला समजलेली कवितेतील सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

२) 'काळाप्रमाणे शब्दांचे स्वरूप बदलते' उदाहरण देऊन स्पष्ट करा.

३) 'पाणी हेच जीवन!' या विधानासंबंधी तुमचे विचार लिहा.

**विभाग ४ : भाषाभ्यास**

**प्र.४ अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.** [८]

१) पुढील वाक्यांचे प्रकार ऑळखा. २

**i)** मरगळ झटकून टाकावी.

**ii)** किती मोठी आहे तुझी शाळा!

**२) कंसातील सूचनेप्रमाणे रूपांतर करा.** २

i) किती सुंदर आहे ताजमहाल! (विधानार्थी करा. )

ii) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी खूप काही केले. ( प्रश्नार्थक करा.)

**३) पुढील वाक्यप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही २)** ४


i) पायांना स्पर्श करणे

ii) भारावून जाणे iii) आनंद गगनात न मावणे


**प्र.४ आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.** [८]

१) शब्दसंपत्ती.

i) **खालील शब्दाचे दोन समानार्थी शब्द लिहा.**




ii)




१

ii) **शब्दसमुहाबद्दल एक शब्द लिहा.** १

अ) दररोज प्रसिद्ध होणारे - __________

ब) भाषण देणारी व्यक्ती - __________

iii) **पुढील शब्दांचे वचन बदला.** १

अ) डोळा - ब) काठ्या -

iv) **पुढील शब्दाचे लिंग बदला.** १

अ) बैल -

ब) उंदीर -

**२) गटातील अचूक शब्द ऑळखा.** २

i) दात्रुत्व / दातृत्त्व / दातृत्व / दतृत्व.

ii) श्रृती / श्रुती / सृती / सरूती.

**३) योग्य विरामचिन्हे वापरा व वाक्य पुन्हा लिहा.** २

i) मावशी तुम्ही कुठे राहता.

ii) गांधीजींनी चले जाव ही योजना ही घोषणा केली.

**विभाग ५ : उपयोजित लेखन**

**प्र.५ अ) पुढील कृती सोडवा:**

**१) खालील जाहिरात वाचा आणि सूचनेनुसार पत्रलेखन करा.** **[६]**

| महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ अंतर्गत<br>'एकलव्य सहल योजना' विद्यार्थ्यासाठी विशेष | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अजिंठा | रायगड | माथेरान | महाबळेश्वर | भीमाशंकर | एलोरा |
| अधिक माहितीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधा.<br>हेल्पालाइन – १८००-२२-१०८०९५ | | | | | |

वरील योजनेअंतर्गत शाळेची सहल नेण्याबाबत चौकशी करणारे पत्र लिहा.

किंवा

वरील योजनेअंतर्गत नेलेल्या शालेय सहलीसंदर्भात तक्रार करणारे पत्र लिहा.

**अथवा**

**२) सारांश लेखन:** **[६]**

विभाग – १ गदय विभागातील प्र.१(इ) मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांशा तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र.५ आ) पुढील कृती सोडवा. (कोणत्याही दोन )**

**१) दिलेल्या शब्दांवरुन जाहिरातलेखन करा.** **[५]**

प्रवासी बॅग्ज, मजबूत, सुंदर रंग, ग्राहक समाधान

**२) पुढील शीर्षकावरुन कथालेखन करा.** **[५]**


'अशी झाली फ़जिती'

३) खालील शीर्षकावरून बातमी तयार करा. **[५]**

**शाळेत वसुंधरा दिनानिमित्त वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रम, वनाधिकारी मा. श्री. शशिकांत राव यांच्या उपस्थितीत संपन्न**

**प्र.५ इ) खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** **[८]**

१)



वरील घटक तुमच्याशी बोलत आहे अशी कल्पना करुन दिलेल्या मुद्‌दयांच्या आधारे आत्मवृत्त लिहा.

२) अकस्मात पडलेला पाऊस



वरील प्रसंगी तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करुन या प्रसंगाचे लेखन करा.

३) पुढील मुद्‌दयांना विचारात घेऊन निबंध लेखन करा.

